# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०३ ऑगस्ट, २०२३ / श्रावण १२, १९४५ (शके)**

**(१) वैद्यकीय शिक्षण मंत्री**
**(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री**
**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(४) कामगार मंत्री**
**(५) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(६) महिला व बालविकास मंत्री**
**(७) क्रीडा व युवक कल्याण मंत्री**
**(८) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

---

### बेलोरा (बु) (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयामध्ये रूपांतर करण्याबाबत

**(१) * १८८१४ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलोरा (बु) (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अपुऱ्या सोयी सुविधांमुळे सदर भागातील धनगर, आदिवासी समाजाला तसेच माळपठार (ता.पुसद) या डोंगराळ भागातील रहिवाशांना आपत्कालीन प्रसंगी उपचार मिळत नसल्याचे तसेच ४० कि.मी वा त्याहून अधिक अंतरावर असलेल्या यवतमाळ व पुसद येथील रुग्णालयापर्यंत पोहोचण्यापूर्वीच अनेक रुग्णांचा मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयामध्ये रूपांतर करून रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाकडे वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेलोरा (बु) (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयामध्ये रूपांतर करून रुग्णांना योग्य ती आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध असून तेथील नागरिकांना नियमित आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत उपचाराअभावी मृत्यू झाल्याची घटना घडलेली नाही.

(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयांमध्ये करण्याबाबतची मागणी शासनास अद्याप प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जल जीवन मिशनअंतर्गत सोलापूर जिल्ह्याला दिलेले ७५ हजार नळ जोडण्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(२) * १९८१३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जल जीवन मिशनअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात ७५ हजार कुटुंबांना नळ जोडण्या देण्याचे उद्दिष्ट असताना अद्यापही माहे मे, २०२३ अखेर जिल्ह्यात केवळ ११ हजार कुटुंबांना नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सोलापूर जिल्ह्याला दिलेले ७५ हजार नळ जोडण्यांचे उद्दिष्ट सन २०२४ पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात सन २०२३-२४ या वर्षात ७५३१४ कुटुंबांना नळ जोडणी देण्याचे उद्दिष्ट आहे. दिनांक १०/०७/२०२३ अखेर १६०९१ इतक्या नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत. डिसेंबर, २०२३ अखेर प्रगतीपथावरील ८५५ पाणीपुरवठा योजना मधील नळ जोडण्या देऊन उद्दिष्ट पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच सदरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तालुकास्तरावरील गट विकास अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे अध्यक्षतेखाली तालुका स्तरावर प्रत्येक सोमवारी बैठकीचे नियोजन केलेले असून, पंचायत स्तरावरील बीआरसी व सीआरसी तसेच ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचारी यांच्याही बैठका घेवून जल जीवन मिशन अंतर्गत कामे पूर्ण करणे व नळ जोडणी पूर्ण करणेबाबत नियोजन केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निमगाव (ता.खेड, जि.पुणे) येथील नदीजवळ असलेली कॉंक्रीट संरक्षण भिंत व रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३) * १९०३३ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगाव (ता.खेड, जि.पुणे) येथील ग्रामपंचायतींतर्गत श्री क्षेत्र खंडोबाचे देवस्थान असून या देवस्थानाच्या दर्शनाकरीता पुणे जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यातील भाविक येत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायत हद्दीतील नदीच्या बाजूस असलेल्या कॉंक्रीट संरक्षण भिंत व रस्त्याची दुरवस्था झाल्याने डांबरीकरण करणे गरजेचे असतानाही अद्यापपर्यंत झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावातील स्थानिकांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने निमगाव येथील ग्रामपंचायत हद्दीतील नदीच्या बाजूला संरक्षण भिंत बांधण्याबाबत तसेच रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) याबाबत कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही.
(४) सदरच्या रस्त्याची व कॉंक्रीट संरक्षक भिंत बांधण्याच्या जागेची पाहणी केली असून सदर रस्ता एकूण १ कि.मी. असून रस्त्याच्या डांबरीकरण करण्याकरीता रुपये ४५.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच संरक्षण भिंत ५० मीटर लांब असून त्यासाठी रुपये २०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदर कामांच्या मंजुरीसाठी प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मनोरुग्णालयांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) * १९९७१ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मानसिक आजारांसह ताण-तणावाखाली वैद्यकीय उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत असतानाही त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे प्रमाण कमी असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या मनोरुग्णालयातील गट-अ, गट-ब व गट-क मधील ३५ टक्क्यांहून अधिक जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९-२०२०, सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या तीन आर्थिक वर्षांत मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनामार्फत रुपये १०६.३१ कोटी तर शासनामार्फत रूपये ५१.५२ कोटी असे एकूण रूपये १५७.८३ कोटी उपलब्ध करून देण्यात आले आहेत, तसेच शासनाच्या आरोग्य विभागामार्फत यापैकी केवळ रुपये ८.५९ कोटी खर्च करण्यात आले असून उर्वरीत निधी हा वापराविना असून व काही अंशी परत देखील गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनेक मनोरूग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञांची पदे सद्य:स्थितीत रिक्त असून ग्रामीण जिल्ह्यांमध्ये मानसिक आरोग्य सुविधा अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध आहेत असे असतानाही सदर निधी विनावापर पडून राहण्याची तसेच निधी परत जाण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू निधी परत जाण्यास अथवा योग्य प्रमाणात खर्च न होण्यास संबंधित जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर शासन कोणती कारवाई करणार आहे,

(५) असल्यास, भविष्यात केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीचा योग्य प्रकारे विनियोग करण्याच्या दृष्टीने सदर क्षेत्रात कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांशी चर्चा करून त्याबाबत धोरण अथवा कार्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत काय, असल्याच त्याचा तपशील काय आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील मनोरूग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबत तसेच मनोरुग्णालयातील गरजू रुग्णांसाठी तातडीने मदत मिळण्यासाठी प्रशिक्षित वैद्यकीय तज्ञांसह समुपदेशकांची उपलब्धता करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) मानसिक आरोग्य कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी व टेक्निकल मदत करण्यासाठी स्वयंसेवी व अशासकीय संस्था यांच्याकडून सहकार्य घेण्यात येत आहे. जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम व प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे मानसिक आरोग्य सेवा देण्यासाठी UDAAN प्रकल्पामार्फत सहकार्य करण्यात येते. श्रद्धा फाऊंडेशन व बनियन ट्रस्ट मार्फत बरे झालेल्या रुग्णांच्या पुनर्वसनासाठी मदत केली जाते. इंडियन लॉ सोसायटीमार्फत मानसिक आरोग्य कायदा २०१७ संदर्भात प्रशिक्षण देण्यास मदत करते. तसेच एमपॉवर-आदित्य बिर्ला ग्रुपमार्फत राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये Community Mental Health Services साठी मदत करतात. भविष्यात एमपॉवर-आदित्य बिर्ला ग्रुपमार्फत प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे टेलेमानस सेवेसाठी मदत केली जाणार आहे. या सर्व अशासकीय संस्था व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यामध्ये Non Financial सामंजस्य करार करण्यात आले असून याबाबत शासनावर कुठल्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडत नाही.

(६) राज्यातील ३४ जिल्ह्यांतील जिल्हा रुग्णालयामध्ये जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमाव्दारे मानसिक रुग्णांना आरोग्य सेवा देण्यात येते तसेच त्यांच्यासाठी १० खाटा आरक्षित ठेवण्यात येतात. राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात मानसिक रुग्णांना आरोग्य सेवा देण्यासाठी मनशक्ती क्लिनिक सुरु करण्यात आलेले आहे.सध्या प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे, ठाणे व वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र, अंबेजोगाई जि.बीड येथे टेलेमानस सेवेद्वारे समुपदेशन करण्यात येते.

राज्यातील चारही प्रादेशिक मनोरुग्णालयात गट-अ मधील मवैआसे वर्ग-ची मनोविकृती विशेषज्ञांची एकूण २९ पदे मंजूर असून त्यापैकी ११ पदे भरलेली आहेत. उर्वरीत रिक्त पदे पदोन्नती/नामनिर्देशनाने भरण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

-----------------

## कोल्हापूर येथील एनसीसी मुख्यालयांतर्गत एअर विंग एनसीसीचे अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत

**(५) * १९७४६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील एनसीसी मुख्यालय सन १९६० पासून सुरु असून त्यामध्ये फक्त आर्मी व नेव्हीचा अभ्यासक्रम शिकविला जात असून विद्यार्थ्यांसाठी एअर फोर्सचा अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता गत ७ ते ८ वर्षांपासून एनसीसीकडून एअर विंगची मागणी होत असल्याने शिक्षण विभागाच्या सहसचिवांनी मा.प्रादेशिक संचालक एअर पोर्ट प्राधिकरणाला मंजूरीचे पत्र दिले असून एनसीसीचे अतिरिक्त महासंचालक यांनी प्राधिकरणाला जागा मिळण्याबाबत मागणी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर येथील एअर विंग एनसीसीला केंद्र सरकारने तत्वत: मंजूरी देऊन त्यासंबंधीची नस्ती मा.डायरेक्टर जनरल एनसीसी, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने जागेची पूर्तता झाल्यास कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या पाच जिल्हयांतील महाविद्यालयीन व हायस्कूलच्या शेकडो विद्यार्थ्यांना एअर विंग एनसीसीची एक नवी संधी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने जागा उपलब्धतेच्या दृष्टीने तसेच एअरविंग एनसीसीचे अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.संजय बनसोडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) एअर विंग NCC करीता जागा मिळणेसाठी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, नवी दिल्ली यांना स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हा परिषदेच्या दलित विकास निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * १९३५९ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर दबाव टाकून हँडवॉशच्या नावाखाली समर्थ प्रोव्हिजन, वर्धा या फर्मने रुपये २० कोटीच्या दलित विकास निधीत गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार स्थानिक नागरिकांनी महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग यांच्याकडे करुन याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्हा परिषदेवर प्रशासक असल्याने जिल्हा परिषदेतील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी संघटीत गुन्हेगारीने जिल्ह्यातील जवळपास ५०० पेक्षा जास्त ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकांवर दबाव टाकत अनावश्यक असलेले रुपये ५,०००/- किंमतीचे हॅडवॉश यंत्र रुपये ५०,०००/- किंमतीने खरेदी करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, मराठवाडा विभाग, औरंगाबाद यांनी ५ सदस्यीय चौकशी समिती नेमली असून सदर समितीने शासनास अहवाल सादर केला आहे, आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अहवालानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.

सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी समिती नेमली असून सदर समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार संबंधितास नोटीस देवून त्याच्याकडून खुलासा मागविण्यात आला. त्यांनी सादर केलेल्या खुलाश्याचे अवलोकन केले असता ग्रामपंचायतीने हँडवॉश स्टेशन + चप्पल स्टॅंड + सॅनिटायझेशन किट खरेदी बाबतची प्रक्रिया ही महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ नियम ४५ प्रमाणे ग्रामपंचायतीने अवलंबलेली असल्याचे दिसुन येते. त्यामुळे प्रति युनिट रुपये १६,०८८/- अतिप्रदान झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नाही. तसेच ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक यांनी दिलेल्या खुलाशास अनुसरुन गट विकास अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात सदरील अतिप्रदान रक्कम वसुलपात्र ठरत नसल्याचे नमुद करुन सदरील खुलासे मान्य करण्याची शिफारस केलेली असून त्यास जिल्हा परिषद हिंगोली या कार्यालयाने सहमती दर्शविली आहे.
(४) उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून सदरील कामासाठी दलीत विकास निधी अंतर्गत खर्च झालेला नसून १५ वा केंद्रिय वित्त आयोग निधी अंतर्गत (ग्रामपंचायतस्तर) मधुन सदरची खरेदी ग्रामपंचायतींनी केलेली आहे.

हिंगोली जिल्ह्यातील एकूण ५६३ ग्रामपंचायतींपैकी २२३ ग्रामपंचायतींनी १५ वा वित्त केंद्रिय वित्त आयोगाच्या ग्रामपंचायत स्तरावरील निधीतून २७४ युनिट हँडवॉश स्टेशन खरेदी केलेली आहे. ग्रामपंचायतीने खरेदी केलेल्या हॅडवॉश स्टेशनच्या दर पत्रकानुसार (ज्या मध्ये स्टॅंड, टाकी, बेसिन व रिंग) तसेच शोष खड्डा, चप्पल स्टॅड व सेनिटाझेशन किट (हँडवॉश, साबन, मॉप, ब्रुम, कंगवा, सोपकेस, आरसा, नेलकटर, बादली, मग, डोअर, मॅट, टॉयलेटक्लिनर, फिनाईल, टॉवेल, नॅपकीन, गारबेज प्लेट, डस्टबिन, नॅपथलीन बॉल्स, सॅनिटायझर) इत्यादी साहित्याचा एका हँडवॉश स्टेशन युनिट मध्ये समावेश आहे. प्रति युनिट किंमत रु ५०,०००/- आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मनोर (जि.पालघर) येथील ट्रॉमा केअर सेंटरच्या बांधकामाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत

**(७) * १८९२७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर (जि.पालघर) येथील मुंबई–अहमदाबाद महामार्गालगतच्या ट्रॉमा केअर सेंटरच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित वायरिंग, लिफ्ट, फर्निचर, पाणीपुरवठा, कुंपण, ऑक्सिजन पाईपलाईन तसेच रुग्णांसाठी बेड आणि ऑपरेशनचे साहित्य या कामांकरीता अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याची मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आली असून सदर प्रस्ताव उच्चाधिकार समितीकडे विचाराधीन असल्याची बाब दिनांक २१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ट्रॉमा केअर सेंटरचे काम पूर्ण करण्यासाठी सन २०२१ पर्यंतची मुदत देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मनोर (जि.पालघर) येथील २०० खाटांचे सामान्य रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर युनिट इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मनोर येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन २०० खाटांचे रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर युनिट इमारत बांधकामाचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर ठिकणी जिल्हा रुग्णालय आणि अद्ययावत शासकीय आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना गुजरात राज्यात उपचारासाठी जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, रुग्णांना अत्यावश्यक उपचार मिळावे याकरीता मनोर येथील ट्रॉमा केअर सेंटरच्या उर्वरित कामांसाठी आवश्यक असलेला निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) व (३) होय.

(४) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) नाही.

जिल्हा मुख्यालयात मनोर येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहे. जिल्हा पालघर मध्ये एकूण ३० खाटांचे ९ ग्रामीण रुग्णालये, ५० खाटांचे १ उपजिल्हा रुग्णालय व २०० खाटांचे ०२ उपजिल्हा रुग्णालये कार्यरत असून रुग्णालयात दाखल रुग्णांवर आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

(६) सदर रुग्णालयाचे बांधकाम ६० टक्के झालेले असून उर्वरित बांधकाम प्रगतीपथावर आहे.

मनोर येथील २०० खाटांचे रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर सेंटरच्या इमारतीस वाढीव बांधकामाच्या अंदाजपत्रक व आराखड्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यात पंतप्रधान जन आरोग्य योजनेचा लाभ शहरी व ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबांना मिळण्याबाबत

**(८) * १९९०२ श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत २.५३ कोटी लाभार्थ्यांपैकी केवळ ३४ टक्के लाभार्थ्यांनाच कार्डचे वाटप झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्ड वाटपाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने गंभीर आजाराच्या रुग्णांना वेळेत उपचार मिळत नसून त्यांना खाजगी रुग्णालयात स्वखर्चाने उपचार घ्यावे लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरी व ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील अनेक कुटुंबे या योजनेसाठी पात्र असतानाही योजनेतील अनेक जाचक अटींमुळे राज्यातील सुमारे ६.२५ लाख अर्ज फेटाळण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आपले सरकार सेवा केंद्रावर या कार्डचा लाभ घेण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांना योजनेसंदर्भात अनेक समस्या उद्‌भवत असून लाभापासून वंचित रहात आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच आयुष्मान भारत योजनांतील जाचक अटी कमी करुन रुपये ७ लाखांच्या आतील उत्पन्न असलेल्या सर्व नागरिकांना या योजनेचा लाभ देण्याबाबत व केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे. नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांपैकी अतिरीक्त माहिती संकलन मोहीमेद्वारे ओळख पटलेल्या एकूण ९३.०५ लाख लाभार्थ्यांपैकी दिनांक १२ जुलै, २०२३ अखेर पर्यंत ९६.९९ लक्ष लाभार्थ्यांना आयुष्मान कार्डचे वाटप करण्यात आले आहे. कार्ड वाटपाचे हे प्रमाण ३८ टक्के इतके आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील पात्र लाभार्थ्यांपैकी दिनांक १२ जुलै, २०२३ अखेर एकूण ९६,९९,७९७ इतक्या लाभार्थ्यांची यशस्वी पडताळणी करुन त्यांना आयुष्मान कार्ड चे वितरण करण्यात आले आहे. तर ज्या लाभार्थ्यांनी कार्ड मिळण्यासाठी आवश्यक अटींचे निकष पूर्ण केले नाहीत अशा एकूण ७,८७,३५८ इतक्या लाभार्थ्यांचे अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थी कुटुंबे सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ (SECC) नुसार ग्रामीण व शहरी भागांकरिता अनुक्रमे वंचितता आणि व्यवसाय या निकषांवर आधारीत केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार शहरी भागातील कचरा वेचक, भिक्षुक, घरगुती कामगार, गटई कामगार, मोची, फेरीवाले, प्लंबर, सफाई कामगार, माळी इ. प्रकारच्या व्यावसायिक निकषांवर लाभार्थ्यांचा समावेश आहे. तर ग्रामीण भागामध्ये एकूण ७ वंचितता निकषांच्या आधारे लाभार्थी निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये कच्च्या भिंती व कच्च्या छताच्या एका खोलीत राहणारे कुटुंब, प्रौढ सदस्य नसलेली कुटुंबे, दिव्यांग कुटुंब प्रमुख कुटुंबे, अनुसूचित जाती व जमातीमधील कुटुंबे, भूमिहीन मजूरांची कुटुंबे इत्यादी प्रकारच्या लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

सदर लाभार्थ्यांचे निकष हे व्यक्तीच्या/ कुटुंबाच्या उत्पन्नावर आधारीत नाहीत. त्यामुळे ७ लाखाच्या आतील उत्पन्न असलेल्या सर्व नागरिकांना या योजनेचा लाभ देण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे गोद्री (ता.जामनेर, जि.जळगाव) येथे अखिल भारतीय गोर बंजारा व लावणा नायकडा समाज कुंभ २०२३ या कार्यक्रमांतर्गत निधीचा गैरवापर केल्याबाबत

**(९)** * **१९२६६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोद्री (ता.जामनेर जि.जळगाव) येथे दिनांक २५ ते ३० जानेवारी, २०२३ या कालावधीत आयोजन करण्यात आलेल्या अखिल भारतीय गोर बंजारा व लावणा नायकडा समाज कुंभ २०२३ च्या कार्यक्रमात शासन निधीचा दुरुपयोग व मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली असून सदर कालावधीत झालेल्या खर्चाची उच्चस्तरीय समिती मार्फत चौकशी होणेसाठी मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ मे २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे पत्रव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमेद अभियान आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मिलेट्स रिसर्च (हैदराबाद) यांच्यामध्ये भरडधान्य प्रक्रियायुक्त पदार्थांच्या आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रशिक्षण याकरिता झालेल्या कराराबाबत

**(१०) * १९६५१ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमेद अभियान आणि हैदराबाद येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मिलेट्स रिसर्च (आयआयएमआर) यांच्यामध्ये राज्यातील भरड धान्यांवर आधारित व्यावसायिक निर्मिती वाढविण्यासाठी करार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये १२७७५ एकर क्षेत्राचे विविध भरडधान्य लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करुन सोलापूर, पालघर आणि नंदुरबार ह्या जिल्ह्यांतील शेतकरी उत्पादक कंपन्यांचे काम या कराराच्या माध्यमातून होणार असून उमेद अभियानांतर्गत महिला शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमेद अभियानाच्या माध्यमातून सदर नऊ जिल्ह्यात भरड धान्य लागवड करीत असतानाच सोलापूर, सांगली, पुणे, अहमदनगर,जळगाव, उस्मानाबाद, लातूर,बीड, जालना,नांदेड या जिल्ह्यांसह दुष्काळी व कमी पर्जन्यमान असणाऱ्या जिल्ह्यात भरडधान्य लागवड वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

उमेद अभियान आणि हैद्राबाद येथील इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मिलेट्स रिसर्च (IIMR) यांच्यामध्ये IIMR मार्फत तयार करण्यात आलेल्या भरडधान्य प्रक्रियायुक्त पदार्थांच्या आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रशिक्षण याकरीता ३६ महिन्यांसाठी करार करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये १२७७५ एकर क्षेत्रावर विविध भरडधान्य लागवडीसाठी महिला शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या मदतीने प्रोत्साहित करण्यात येत आहे. या करारान्वये सध्या कार्यरत असलेल्या सोलापूर, पालघर आणि नंदुरबार जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांतर्गत भरडधान्य प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करून त्या पदार्थांचा व्यवसाय करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण देण्याचे नियोजित आहे. या करारान्वये शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्याचे नियोजित नाही.

(३) राज्यातील उमेद अभियानांतर्गत नऊ जिल्ह्यांमध्ये विविध भरडधान्य लागवडीसाठी महिला शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या मदतीने प्रोत्साहित करण्यात येत आहे. त्यानुसार या विभागामार्फत नऊ जिल्ह्यांमध्ये भरडधान्याबाबत जनजागृती करण्यसाठी कृषी विभागासोबत कृतीसंगम करून भरडधान्य कार्यशाळा, पाककला स्पर्धा, प्रदर्शने इ. सारखे उपक्रम राबविले जात आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महिलांचे प्रसूतीदरम्यानचे मृत्यू रोखण्याबाबतच्या उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(११) * १८९५० श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने गत सहा वर्षांमध्ये सन २०१७ ते २०२२ या कालावधीत (माहे डिसेंबरपर्यंत) राज्यात ७५१६ महिलांचे प्रसूतीदरम्यान मृत्यू झाले असून पश्चिम महाराष्ट्रामध्ये या सहा वर्षांच्या कालावधीमध्ये अनुक्रमे १८६, २३५, २६०, २०१, ३२४, १६१ महिलांचे प्रसूतीदरम्यान मृत्यू झाले असून एकूण मृत्यूंपैकी १८ टक्के मृत्यू हे पश्चिम महाराष्ट्रातील असल्याची बाब दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण तसेच आदिवासी भागांमध्ये आजही घरी प्रसूती करण्यासाठी प्राधान्य दिले जात असून ॲनिमिया, रक्त कमी असणे, अतिरिक्त रक्तस्राव, प्रसूतीनंतर लगेच होणारा संसर्ग, रुग्णवाहिकांच्या सुविधा न मिळाल्याने आरोग्य केंद्रामध्ये पोहोचण्यास उशीर होणे, अपुऱ्या दिवसांची प्रसूती, उच्च रक्तदाब, यामुळेही होणारे मृत्यू अधिक असल्याची बाब निदर्शनास आली असून त्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, मागील काही वर्षांत प्रगत औषधोपचार आणि तंत्रज्ञानाचा वेग वाढल्यानंतर प्रसूतीप्रसंगी होणाऱ्या मृत्यूंची संख्या कमी होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात तसे परिणाम दिसत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महिला व मुलांच्या आरोग्यासाठी अनेक कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील महिलांचे प्रसूतीदरम्यान होत असलेले मृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१७ ते २०२२ (माहे डिसेंबरपर्यंत) राज्यात ७५१६ मातामृत्यू झाले असून प्रसुती दरम्यान १२९ माता मृत्यू झाले आहेत.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये सन २०१७ ते २०२२ (माहे डिसेंबरपर्यंत) या सहा वर्षांच्या कालावधीमध्ये अनुक्रमे १८६, २३५, २६०, २०१, ३२४, १६१ माता मृत्यू झाले असून प्रसूतीदरम्यान अनुक्रमे ४, १, १, १, २, १ महिलांचे मृत्यू झाले आहेत व एकूण मृत्यूंपैकी १८ टक्के मृत्यू हे पश्चिम महाराष्ट्रातील आहेत.

(२) १) ग्रामीण तसेच आदिवासी भागामध्ये शासनाद्वारे संस्थात्मक प्रसूतीला प्रोत्साहन देण्यात येत असल्याने घरी होणाऱ्या प्रसूतीचे प्रमाण कमी झाले आहे.

२) ॲनिमिया, रक्त कमी असलेल्या गरोदर मातांच्या याद्या बनविण्यात येतात व त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये लोहयुक्त गोळया देण्यात येतात. तीव्र रक्ताक्षय असलेल्या गरोदर मातांना शासकीय संस्थेमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शिरेद्वारे इंजेक्शन आर्यन सुक्रोज देण्यात येते. गरोदरपणी हिमोग्लोबीनचे प्रमाण ५ gm/dl पेक्षा कमी आढळल्यास अशा लाभार्थीला रक्तसंक्रमण करण्यात येते.

३) प्रसूतीपुर्व व प्रसूतीपश्चात रक्तस्त्राव नियंत्रणासाठी दक्षता प्रशिक्षण तसेच स्किलबर्थ ॲटेन्डेंटचे प्रशिक्षण देण्यात येते.

४) रक्तसंक्रमण आवश्यक असलेल्या गरोदर मातांना ब्लड बँक व ब्लड बँक स्टोरेज युनिटची सुविधा असलेल्या प्रथम संदर्भ सेवा केंद्रामध्ये १०२/१०८ ॲम्ब्युलन्सने संदर्भित केले जाते.

५) प्रसूतीनंतर लगेच होणारा जंतूसंसर्ग नियंत्रणासाठी आशामार्फत ४२ दिवसांपर्यंत HBNC भेटी देण्यात येतात. तसेच ग्राम आरोग्य व पोषण दिन (VHND) सत्रामध्ये स्तनदा मातांची तपासणी करण्यात येते.

६) घरी प्रसूती जास्त होणाऱ्या १० तालुक्यांमध्ये, गरोदर मातेस प्रसूतीच्या दरम्यान १०२/१०८ मोफत रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्यास मातेला रुग्णालयात घेवून जाण्यासाठी आशा कार्यकर्तींना नमूनात्मक अग्रिम रक्कम रुपये १००० निधी देण्यात येतो.

७) प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान अंतर्गत प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीतील महिलांची तज्ञांकडून नियमित तपासण्या करुन आवश्यक त्या प्रयोगशाळा चाचण्या व मोफत सोनोग्राफी करण्यात येतात, अतिजोखमेच्या मातेस अधिक ४ भेटी देण्यात येतात. तसेच आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा पुरविण्यात येते.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) माता मृत्यू टाळण्यासाठी शासनामार्फत जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, मातृत्व अनुदान योजना, मानव विकास कार्यक्रमांतर्गत बुडीत मजुरी, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, ॲनिमिया मुक्त भारत अभियान, संस्थात्मक प्रसूतीसाठी प्रोत्साहन, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, लक्ष्य कार्यक्रम, सुरक्षित मातृत्व आश्वासन इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत.

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेच्या एक शिक्षकी शाळा बंद होणार असल्याबाबत

**(१२) * १९४३४ श्री.सचिन अहिर, श्री.महादेव जानकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये काम करणाऱ्या ४६७ शिक्षकांची अन्य जिल्ह्यांमध्ये बदली केल्यामुळे जिल्ह्यातील सुमारे १०० एकशिक्षकी शाळा बंद होणार असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने पालघर जिल्ह्यातील ४६७ शिक्षकांची बदली इतर जिल्ह्यात करण्याचा निर्णय घेतल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालघर जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांच्या बदल्या जिल्ह्याबाहेर करण्यामागची कारणे काय आहेत,
(४) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता पालघर जिल्ह्यातील १०० एकशिक्षकी शाळा बंद न होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ग्रामविकास विभागाच्या दिनांक ०७/०४/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित शिक्षकांनी केलेल्या विनंती अर्जानुसार त्यांच्या आंतरजिल्हा बदल्या ऑनलाईन पोर्टलव्दारे करण्यात आलेल्या आहेत.
(४) पालघर जिल्हा आदिवासी बहुल असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून सन २०१७ ते २०२२ मध्ये आंतरजिल्हा बदली झालेल्या ४८६ प्राथमिक शिक्षकांना स्थायी समिती व सर्वसाधारण सभा, जिल्हा परिषद पालघर यांनी ठराव केल्यानुसार पर्यायी व्यवस्था होईपर्यंत आजतागायत कार्यमुक्त केलेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साजापूर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) या गावाकरिता राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत

**(१३) * १८८३० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साजापूर (ता.गंगापूर,जि.औरंगाबाद) या गावाकरिता सन २०१९ मध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेतंर्गत पाणी साठविण्यासाठी टाकी, विहिर, पाईपलाईन इत्यादी मंजूर झालेल्या कामांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेत आतापर्यंत रुपये ६६ लक्ष खर्च झाले असून संबंधित ठेकेदार अत्यंत संथ गतीने काम करीत असल्यामुळे सदर योजना अपूर्ण असून अद्यापपर्यंत नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेची तात्काळ अंमलबजावणी करावी अन्यथा एमआयडीसीने सदर गावास पाणीपुरवठा करावा यासाठी गावातील नागरिक व स्थानिक पदाधिकारी यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, साजापूर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) पाणीपुरवठा योजना तात्काळ पूर्ण करण्याबाबत अथवा गावास एमआयडीसीने पाणीपुरवठा करावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

साजापूर हे गाव गंगापूर तालुक्यात नसून, औरंगाबाद तालुक्यात आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर योजनेस दिनांक ०४/०२/२०१४ रोजी प्रशासकीय मान्यता दिनांक २८/०१/२०१८ रोजी तांत्रिक मान्यता व निविदेच्या कामास दिनांक २६/०८/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. कामाची मुदत दिनांक २६/०८/२०१९ पर्यंत १८ महिने होती. योजनेत झालेल्या तांत्रिक बदलामुळे तसेच उद्भवलेल्या कोविड परिस्थितीमुळे काम पूर्ण होण्यास विलंब झाला. दिनांक १७/०२/२०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार राष्ट्रीय पेयजल योजना भारत निर्माण योजना आहे त्या स्थितीत अंतिम करण्याचे आदेश प्राप्त होते. त्यानुसार योजना अंतिम करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत, साजापूर गावास भारत निर्माण योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या तसेच ५ वर्षापूर्वी लोकवर्गणीतून घेण्यात आलेल्या विहिरींमधुन अस्तित्वातील ३५ हजार लिटर क्षमतेच्या जलकुंभाचा वापर करून पाणीपुरवठा होत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) जल जीवन मिशन अंतर्गत साजापूर गावाकरीता एमआयडीसीचा सम्प हा शाश्वत उद्भव घेवून रुपये २३८.१० लक्ष किंमतीची योजना मंजूर आहे व त्या योजनेचे कार्यारंभ आदेश दिनांक ३१/०१/२०२३ रोजी देण्यात आले आहे. काम पूर्ण करण्यास १२ महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे.

(५) लागू नाही. कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मौजे भाकरवाडी (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील वसना नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत

**(१४)** * **१८८२१ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भाकरवाडी (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील वसना नदीवरील पूल सन २०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पूर्णपणे उद्ध्वस्त झाला असून, सदर पूल जळगाव, भाकरवाडी व कोरेगाव या रस्त्याला जोडून असल्यामुळे तेथील नागरिकांची तसेच विद्यार्थी व रुग्णांची ये-जा करण्यासाठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत तेथील मा.लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आल्या आहेत काय, त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

भाकरवाडी जोड रस्ता ता.कोरेगाव जि.सातारा या ग्रा.मा.१०० वरील साकवाचा वाहक मार्ग अतिवृष्टीमुळे काही प्रमाणात वाहून गेलेला होता. तथापि, सदर ठिकाणचा पूल Submersible प्रकारचा असल्याने अतिवृष्टीवेळी १ ते २ दिवस पुलावरुन पाणी जात असल्यामुळे वळसा घालून जावे लागते.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) जिल्हा परिषद, सातारा यांना सदर पूलाची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर ठिकाणी नवीन पूल बांधणे आवश्यक आहे. सदर प्रस्तावित नवीन पूल हा मोठ्या स्वरुपाचा असल्याने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा यांचेकडून नवीन पूल नाबार्ड-२८ अंतर्गत बांधण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास अद्याप मंजूरी मिळालेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील शासकीय जमिनीवर क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(१५) * २००७३ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामीण रुग्णालयासमोरील ७ एकर शासकीय जमीन पाच वर्षापुर्वी शासनाने क्रीडा संकुलासाठी हस्तांतरीत करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी महसूल विभागास दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना महामारीच्या काळात जिल्हा क्रीडा विभाग व महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे हस्तांतरणाची प्रक्रिया प्रलंबित असून, आता सदर जागा एका आंतरराष्ट्रीय शाळेला देण्यात आल्याचे दिनांक १९ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जागा क्रीडा संकुलासाठी शासनाने आरक्षित करुन महसूल विभागाने सदर जागा क्रीडा संकुलासाठी हस्तांतरित करण्याचे आदेश काढूनही सदर जागा आंतरराष्ट्रीय शाळेला हस्तांतरित करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सदर जागा पुन:श्च क्रीडा विभागाकडे हस्तांतरित करून, सदर जागी क्रीडा संकुल उभारण्याकरीता निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) दिनांक २०/८/२०१६ रोजी जिल्हा नियोजन समिती, ठाणे येथील बैठकीमध्ये तत्कालीन मा.पालकमंत्री महोदय यांनी मौजे खर्डी, ता.शहापूर येथील जमीन शहापूर येथील प्रस्तावित तालुका क्रीडा संकुलासाठी उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले होते.
(२), (३) व (४) तालुका क्रीडा संकूल वापर अनुज्ञेय होण्यासाठी किमान १२ मी. रुंदीचा पोहच मार्गासह आवश्यक ८ एकर क्षेत्र सलग नसल्याने क्रीडा संकुलाकरीता अन्य जागेचा पर्याय तपासण्यात येत आहे. तसेच नमूद करण्यात येते की, आंतरराष्ट्रीय शाळेला देण्यात आलेली जागा ही उक्त प्रमाणे प्रस्तावित असलेल्या जागेशी संबंधित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) *२०२८२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) पंतप्रधान आवास योजनेमधून 'सन २०२४ पर्यंत मागेल त्याला घर' अशी घोषणा केंद्र शासनाने केली असून पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून सन २०१८ मध्ये 'आवास प्लस' या ॲपद्वारे लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत ३० हजार लाभार्थ्यांपैकी केवळ ३ हजार लाभार्थ्यांना घरकुले मिळाली असून सुमारे २७ हजार लाभार्थी कुटुंबे घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित असल्याबाबत 'समर्थन' संस्थेने दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (आदिवासी विकास), अवर सचिव (आदिवासी विकास विभाग), आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांना पत्राद्वारे निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने घरकुल योजनेपासून वंचित असलेल्या २७ हजार पात्र आदिवासी लाभार्थी कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्याकरीता शासनाने पर्यायी योजना आखण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) ठाणे जिल्ह्याकरीता प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत आवास प्लस प्रपत्र "ड" ची प्राधान्यक्रम यादी ३०३३० कुटुंबांची अंतिम करण्यात आलेली असून त्यापैकी १५११४ कुटुंबे अनुसूचित जमाती संवर्गाची आहेत. त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत सन २०१८-२०१९ ते सन २०२२-२३ करीता ठाणे जिल्ह्याकरीता २५५६ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त असून १०० टक्के घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच सन २०२३-२४ करीता २००० घरकुलांची उद्दिष्ट प्राप्त असून घरकुले मंजुरीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(१७) * २०३४८ श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात रूग्णालयांच्या संख्येच्या तुलनेत खाटांची संख्या कमी असून १ लाख लोकसंख्येमागे केवळ १०३ खाटा उपलब्ध असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्याच्या सिमेलगत असलेल्या नजीकच्या चंद्रपूर व गोंदिया जिल्ह्यांतून रुग्ण संदर्भित होत असून सदर १०० खाटांच्या रुग्णालयात ३०० च्या आसपास रुग्ण दाखल होत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महिला व बाल रुग्णालय, गडचिरोली येथील रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता अतिरिक्त १०० खाटांचे बांधकाम राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत एकात्मिक विकास शाखेद्वारे (आयडीडब्ल्युद्वारे) करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चामोर्शी, एटापल्ली व सिरोंचा (जि.गडचिरोली) ह्या ग्रामीण रुग्णालयांचे शासन निर्णय दिनांक ९ जून, २०१४ अन्वये उपजिल्हा रुग्णालयांमध्ये श्रेणीवर्धन करण्यात आले आहे काय, तसेच मंजूर असलेल्या डीपीसीयु व आयसीयु खाटांना मंजूरी देण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, सदर जिल्हयांतील रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्यासाठी निधी उपलब्ध करुन रूग्णालयाची स्थिती सुधारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय चार्मोशीचे ५० खाटांमध्ये श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालय बांधकामाच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दिनांक ०७/०६/२०२२ अन्वये मान्यता दिली असून सन २०२३-२४ मध्ये रुपये २.०० कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

तसेच ३० वरुन ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय एटापल्लीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे तसेच उपजिल्हा रुग्णालय सिरोंचा येथील इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनास अप्राप्त आहे.

-----------------

## कळवा (जि.ठाणे) येथील मफतलाल कंपनीच्या जमीन विक्रीतून कामगारांची देणी, शासन देणी तसेच वित्तीय संस्थांच्या कर्जाची परतफेड करण्याबाबत

**(१८) * २०४१३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा येथील मफतलाल कंपनी (जि.ठाणे) काही वर्षांपासून बंद झाली असून सदर कंपनीत सुमारे ३००० कामगार कार्यरत होते त्यातील १९०० कामगारांचे निधन झाले असून तीस वर्षानंतरही या कामगारांच्या मागण्या अद्याप प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीची जमीन सुरक्षित ठेवण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने सीमा आखून दिलेली असताना देखील येथील अर्ध्याहून अधिक भाग झोपडपट्टीवासीयांनी व्यापला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीच्या जमिनीच्या विक्रीतून कामगारांची देणी, शासन देणी तसेच वित्तीय संस्थांच्या कर्जाची परतफेड करणे शक्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मफतलाल कंपनीची जमीन तातडीने विकून प्रलंबित असलेली कामगारांची देणी, शासन देणी तसेच वित्तीय संस्थांचे कर्जाची परतफेड करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे आहे.

मे.मफतलाल इंजिनिअरींग इंडस्ट्रीज लि., कळवा, जि.ठाणे ही आस्थापना सन १९७३ पासून कार्यरत असून सदर आस्थापनेत ३१०० कामगार कर्मचारी कार्यरत होते. सदर आस्थापनेतील उत्पादन प्रक्रिया बंद झाल्याने व कारखाना पुनरुज्जीवीत करण्याची योजना कार्यान्वित न झाल्याने द बोर्ड फॉर इंडस्ट्रियल ॲण्ड फायनान्शियल रिकन्स्ट्रक्शनने (बीआयएफआर) दिनांक ०७/०४/१९९५ च्या आदेशान्वये कंपनीचा कारभार समाप्त करण्याचे आदेश दिले. तत्पूर्वी मे.युनायटेड मेटाक्लेम प्रा.लि. व इतर यांनी त्यांच्या थकीत रकमेसाठी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या पिटीशन क्र.७४३/१९९० मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सदर कंपनीची मालमत्ता सन १९९९ पासून मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून नियुक्त कोर्ट रिसिव्हर/अवसायक यांचे ताब्यात आहे.

आस्थापनेतील एकूण ३१०० कामगारांपैकी ३०५४ इतक्या कामगारांनी त्यांच्या थकीत कायदेशीर देय रक्कमेबाबतचे दावे शासकीय समापक यांचेकडे दाखल केलेले असून ४६ कामगारांनी अद्यापि त्यांच्या कायदेशीर देय रक्कमेबाबतचे दावे दाखल केलेले नाहीत. शासकीय समापक यांचेकडून प्राप्त तपशीलानुसार ३०५४ कामगारांचे एकूण रक्कम रुपये १,६२,६९,४३,९१७/- (अक्षरी एक अब्ज बासष्ठ कोटी एकोणसत्तर लाख त्रेचाळीस हजार नऊशे सतरा फक्त) इतक्या रकमेचे दावे दाखल करून घेण्यात आले आहेत. शासकीय समापक यांचेकडून सन २०१९ पर्यंत दावे दाखल करण्यात आलेल्या कामगारांना १५% इतका लाभांश (रुपये २४,४०,४१,५८७/-) दोन टप्प्यांमध्ये देण्यात आलेला आहे.

कामगारांची कायदेशीर देणी देण्याची बाब मा.उच्च न्यायालयाच्या कोर्ट रिसिव्हर व अवसायक यांच्या अखत्यारीत आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) कामगारांची कायदेशीर देणी अदा करणे, ही बाब मा.उच्च न्यायालयाच्या कोर्ट रिसिव्हर/ अवसायक यांच्या अखत्यारीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोहा (जि.रायगड) तालुक्यातील धनगर वस्त्यांमध्ये रस्ते व इतर मूलभूत सोयी -सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९)** * **२०५०६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिटवी, म्हसाडी, वांदरकोंड, खडकी (ता.रोहा, जि.रायगड) इत्यादी भागांत मोठ्या प्रमाणावर धनगर वस्त्या असून सदर भागात अद्यापही दळणवळणाची सुविधा प्राप्त झाली नसल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धनगरवाड्यांमध्ये पायवाटा, रस्ते व पथदिवे नसल्यामुळे रुग्णांना ने-आण करण्यासाठी डोलीचा वापर केला जात आहे तसेच विद्यार्थ्यांची शाळेत ये-जा करताना गैरसोय होत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने धनगरवाड्यांमध्ये दळणवळणाच्या दृष्टीने रस्ते, पथदिवे व इतर मूलभूत सोयी- सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

टिटवी, म्हसाडी, वांदरखोंड, खडकी, ता.रोहा या धनगर वाड्या ग्रामीण मार्ग क्रमांक १५०,१०८, १४३, २१४, १६६ या रस्त्यांनी जोडल्या आहेत. तथापि, सदर रस्त्यांचा काही भाग वनविभागाच्या हद्दीत असल्याने कच्च्या स्वरुपाचा आहे.
(२) हे खरे नाही.
(३) टिटवी, म्हसाडी, वांदरखोंड, खडकी या धनगरवाड्यांमध्ये वीज, पथदिवे व पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहे. टिटवी धनगरवाडी वस्तीमध्ये नळ पाणीपुरवठा योजनेंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये काम मंजूर आहे.

तसेच वनविभागाच्या हद्दीत असलेल्या लांबीच्या रस्ते दुरुस्तीकरीता वनविभागाची परवानगी घेण्याची जिल्हा परिषदेची कार्यवाही सुरु आहे. सदर रस्त्यांची नादुरुस्त लांबी व वन विभागाच्या हद्दीतील रस्ता दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळाने मालक तसेच कामगारांना नोंदणी व वाटप पत्र न दिल्याबाबत

**(२०) * २०५१७ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळाची सन १९८५ पासून निर्मिती झाली असून, सदर माथाडी मंडळाने बाजार समिती आवारातील मालकांची नोंदणी पत्र तसेच माथाडी कामगारांना मालक नेमून दिल्याचे वाटप पत्र अद्यापही दिले नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंडळाच्या निरिक्षकांनी कर्तव्य आणि जबाबदारीमध्ये कसूर केल्यामुळे मंडळाचे आर्थिक नुकसान होत असून सह कामगार आयुक्त यांनी दिनांक २५ जुलै २०२२ रोजी वा त्यासुमारास बैठक आयोजित करून मालक आणि माथाडी कामगार यांची नोंदणी करण्यासाठी सचिव व निरीक्षक यांच्यासह १० सदस्यांचे पथक नियुक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ६ सप्टेंबर २०१६ रोजी शासन निर्णय तसेच मंडळाचा कायदा व योजनेच्या तरतुदीनुसार नोंदीत मालकाने माथाडी कामगारांची मजूरी व लेव्हीची रक्कम धनादेश किंवा आर.टी.जी.एस.द्वारे मंडळात जमा करणे आवश्यक असताना, मंडळ कामगारांकडून रोख रक्कम स्वरूपात वसूल करण्यासाठी पावती पुस्तके छापून देत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासन निर्णय व माथाडी मंडळाच्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) याबाबतचे सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन यांचे निवेदन कामगार आयुक्त यांना दिनांक ०९/०७/२०२२ रोजी प्राप्त झाले आहे.
(२), (३) व (४) सह आयुक्त (माथाडी) यांनी त्यांच्या दिनांक २२/०९/२०२२ रोजीच्या आदेशान्वये अनोंदीत मालक व कामगार नोंदणी करण्यासाठी विविध माथाडी मंडळाचे सचिव व निरीक्षक यांचे प्रत्येकी पाच सदस्यांचे दोन तपासणी पथक नियुक्त केले होते. या आदेशान्वये नियुक्त केलेल्या तपासणी पथकामार्फत बाजार समिती आवारातील आस्थापनांना भेटी देवून सुमारे ६० मालकांची नोंदणी करण्यात आली, त्यानंतर मंडळाच्या निरीक्षक व कर्मचाऱ्यांमार्फत बाजार समिती आवारातील आस्थापनांना भेटी देवून सुमारे ३०८ मालकांची नोंदणी करण्यात आली आहे.

तसेच दिनांक ०६/०९/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये नोंदीत मालकाने माथाडी कामगारांची मजूरी व लेव्हीची रक्कम धनादेश किंवा आर.टी.जी.एस.व्दारे मंडळात जमा करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे.

त्यास अनुसरुन सर्व मालकांना मंडळामार्फत मजुरी व लेव्हीची रक्कम धनादेश/आर.टी.जी.एस. द्वारेच मंडळाच्या खात्यामध्ये जमा करण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. तथापि, मंडळामध्ये रोख स्वरुपात सुध्दा काही रक्कम जमा होते. अशी जमा होणारी मजुरी व लेव्हीची रक्कम मंडळाच्या अधिकृत पावत्यांद्वारेच मंडळात जमा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाथरी (जि.परभणी) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी बनावट शासन निर्णय काढल्याबाबत

**(२१)** * **२०६९६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत ग्रामीण भागातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, संस्थेचे अध्यक्ष व संस्थेचे सदस्य अशा मतदारांना प्रलोभन दाखवून पाथरी येथील एका राजकीय व्यक्तीने ग्रामविकास विभागातील कार्यासन अधिकाऱ्याशी संगनमत करून दिनांक १३ एप्रिल, २०२३ रोजी शासन निर्णय काढल्याबाबतची तक्रार मा.लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई (मध्यवर्ती टपाल केंद्र ग्रामविकास विभाग अ.क्र.-३ दिनांक २१ जून, २०२३) यांच्याकडे पुराव्यासह केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास कार्यासन अधिकारी यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत अपेक्षित फायदा झाला नसल्याचे लक्षात आल्यानंतर दिनांक ४ मे,२०२३ रोजी सदरील शासन निर्णय बनावट असल्याबाबचे आदेश काढले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजकीय फायदा पोहोचविण्यासाठी आदर्श आचारसंहितेचा भंग करणे, खोटे शासकीय दस्तऐवज तयार करणे, निवडणुका जिंकण्यासाठी मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी शासन निर्णयाचा गैरवापर करणे, अपेक्षित उद्दिष्ट्यपूर्ती न झाल्यावर बनावट शासन निर्णय म्हणून गैरप्रकारावर पडदा टाकणे इ.बाबत संबंधित राजकीय व्यक्ती, ग्रामविकास विभागाचे कार्यासन अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांची प्रधान सचिव स्तरावरून सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) तक्रार केली आहे, हे खरे आहे. तथापि, सदर तक्रारमधील नमूद वस्तुस्थिती खरी नाही.

मा.मुख्यमंत्री महोदय व अ.मु.स., वित्त विभाग यांच्या दिनांक २८/०३/२०२३ रोजीच्या टिप्पणीन्वये एकूण २३८ लोकप्रतिनिधींना रुपये १०२२.०० कोटी रक्कमेच्या कामांना मंजूरी दिली असून यामध्ये संबंधित लोकप्रतिनिधींनी दिलेल्या यादीप्रमाणे परभणी जिल्ह्यात दिनांक १३/०४/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ६.९१ कोटी इतक्या रक्कमेची कामे मंजूर करण्यात आली होती. तथापि, सदर कामे परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील असल्याने व संबंधित लोकप्रतिनिधींचा मतदार संघ अन्य मतदारसंघातील असल्यामुळे उक्त दिनांक १३/०४/२०२३ रोजीच्या आदेशास शासन मान्यतेने दिनांक १८/०४/२०२३ च्या पत्रान्वये तूर्त स्थगिती देण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

लेखाशीर्ष २५१५ १२३८ अंतर्गत परभणी व लातूर जिल्ह्यात विकास कामे मंजूर झालेबाबतचा अन्य दिनांक ६/०४/२०२३ रोजीचा शासन निर्णय, मा.मंत्री, (ग्रामविकास) यांच्या कार्यालयाने विभागाच्या निदर्शनास आणला होता.त्यानुसार या विभागातील कागदपत्रे पहाता, सदर शासन निर्णय या विभागातून निगिर्मत झालेला नसून, या शासन निर्णयावर अधिकाऱ्यांची स्वाक्षरी ही बनावट असून अनौपचारीक संदर्भ ही चुकीचा नोंद केल्याचे आढळून आल्याने, सदर अनधिकृत/ बनावट शासन निर्णयाबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये तसेच यासंबंधी जे जबाबदार आहेत त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्याबाबत दिनांक ४/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी व लातूर यांना कळविण्यात आले आहे. तसेच भविष्यात अशा अनधिकृत/ बनावट शासन निर्णय/ पत्रांबाबत खबरदारी घेण्याबाबत शासनाच्या अधिकृत ई-मेल आय डी द्वारे (soyoj६.rdd-mh@nic.in) केलेला पत्रव्यवहारच अधिकृत समजण्याचा व एखाद्या शासन निर्णयाच्या बाबतीत शंका असल्यास, दुरध्वनीद्वारे संपर्क साधून खात्री करण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांना दिनांक ४/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा असतानाही ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यांसह इतर जिल्ह्यात टँकरची संख्या वाढविल्याबाबत

**(२२)** * **२०७४४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा असतानाही ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यांमध्ये टँकरमाफीया व प्रशासनाच्या संगनमताने पाणी पुरवठ्यासाठी एका आठवड्यात टँकरची संख्या दुपटीने वाढली असल्याची बाब माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा असूनही ठाणे, रायगड व पालघरसह इतर जिल्ह्यांतील टँकरच्या संख्येत वाढ करणाऱ्या अधिकारी आणि टँकर माफीयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे व रायगड जिल्ह्यात मार्च, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यापेक्षा चौथ्या आठवड्यात टँकरची संख्या दुपटीने वाढली आहे.

(२) या प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.

तथापि, ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यामध्ये भातसा, तानसा व वैतरणा अशी एकूण ०३ धरणे असून या धरणांमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस पाणीपुरवठा करण्यात येतो. या धरणांमार्फत ग्रामीण भागात पाणीपुरवठा होत नाही. तसेच मुरबाडमध्ये अद्यापही शाई व काळू या दोन मोठ्या धरणांची कामे जलसंपदा विभागामार्फत करण्यात येत आहे. त्यामुळे शहापूर व मुरबाड तालुक्यातील सदर भागातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ग्रामस्त व ग्रामपंचायत यांच्यामार्फत प्राप्त मागणीनुसार जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने वाढीव टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये गतवर्षापेक्षा तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे विहीर, विंधन विहीर, धरण क्षेत्रात बाष्पीभवन झाल्यामुळे पाण्याच्या पातळीत घट झाली होती. त्यामुळे अंशत: पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने ग्रामस्थांच्या सततच्या मागणीमुळे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी टँकर संख्येच्या मागणीत वाढ झाली आहे.

पालघर जिल्ह्यात टँकरद्वारे पाणी पुरवठ्यात कोणतीही वाढ झालेली नाही.

दिनांक ३०/०६/२०२३ पासून ठाणे, रायगड व पालघर या तिन्ही जिल्ह्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय बाल कामगार विकास प्रकल्प पुन्हा सुरु करण्याबाबत

**(२३) * २०७७२ श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयातर्फे ठाणे जिल्ह्यात पालकांबरोबर मोलमजुरीसाठी अन्य भागात स्थलांतरित होणाऱ्या बालकांना त्यांच्या हक्काचे शिक्षण स्थलांतरित ठिकाणी उपलब्ध होऊन बालमजुरी पासून मुक्तता व्हावी, याकरीता काही वर्षांपूर्वी सुरु करण्यात आलेला राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प कोरोना कालावधीनंतर बंद पडला असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प बंद पडल्यामुळे राज्यातील १६ जिल्ह्यांतील १८००० मुले शिक्षणापासून वंचित असून अहमदनगर, जालना, लातूर, परभणी, वर्धा व नंदुरबार या सहा जिल्ह्यात सन २०२० मध्ये २,५५६ तर सन २०२२ मध्ये ३,३०९ बाल कामगार असल्याची बाब ‘बाल हक्क व क्राय’ या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून शासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील मुरबाडसह इतर तालुक्यांतील डोंगराळ व दुर्गम भागातील शेकडो आदिवासी कुटुंबे उदरनिर्वाहाकरिता शहरी भागातील वीट भट्ट्यांवर किंवा पुणे जिल्ह्यातील शेतात काम करण्यासाठी स्थलांतरित होत असून, बालविकास विभागाने केलेल्या सदर आदिवासी पाड्यांच्या सर्वेक्षणात २४१ बालके कुपोषित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थलांतरित बाल कामगार असलेल्या जिल्ह्यांचे पुन्हा नव्याने सर्वेक्षण करून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य बाल हक्क व संरक्षण आयोगाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने या स्थलांतरित कुटुंबियांच्या मुलांना हक्काचे शिक्षण मिळून त्यांची बालमजुरीपासून मुक्तता व्हावी याकरीता बंद पडलेला राष्ट्रीय बाल कामगार विकास प्रकल्प सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प केंद्र शासनाने शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या समग्र शिक्षा अभियान या योजनेमध्ये समाविष्ठ केला आहे.

(२) व (३) अशा आशयाच्या बातम्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये दिनांक १६/०५/२०२३ व दिनांक ३०/०५/२०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या आहेत, हे खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाडसह अन्य तालुक्यातील काही कुटूंबे रोजगारासाठी पावसाळ्यानंतर स्थलांतरित होतात, ही बाब खरी आहे.

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कार्यरत ९ प्रकल्पांमधील सद्य:स्थितीत मध्यम तीव्र कमी वजनाची सुमारे ८७०५ बालके व अति तीव्र वजनाची १७२३ बालके आढळलेली आहेत. त्यापैकी, मुरबाड तालुक्यातील २ प्रकल्पांतील कुपोषित बालकांची संख्या २१३ इतकी आहे.

(४) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने याबाबत कोणताही निर्णय दिलेला नाही.

(५) राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प केंद्र शासनाने शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या समग्र शिक्षा अभियान या योजनेमध्ये समाविष्ठ केलेली असून, सदर योजनेचे लाभ त्यांना देण्यात येतात. तसेच, राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पातील शिक्षण घेत असलेली मुले जोपर्यंत शिक्षणाच्या मूळ प्रवाहात दाखल होत नाहीत तोपर्यंत त्या शाळा सुरु ठेवण्यात आल्या होत्या.

राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प पुन्हा सुरु करण्याची बाब ही केंद्र शासनाची धोरणात्मक स्वरुपाची बाब आहे.

-----------------

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाला प्राप्त झालेल्या वर्गणीतून कामगार व त्यांच्या कुटुंबांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत

**(२४) * २०७९४ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात श्रमिकांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली असून कल्याण निधी अधिनियमानुसार मंडळाला कामगार, मालक आणि शासन अशा त्रिपक्षीय वर्गणीतून कामगार व त्यांच्या कुटुंबांसाठी कल्याणकारी योजना राबविल्या जातात, परंतु पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सोलापूर या क्षेत्रिय विभागात जमा झालेल्या वर्गणीच्या प्रमाणात योजनांना निधी मिळत नसल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहावी व बारावीत ६० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या कामगारांच्या पाल्यांना वार्षिक २००० रुपये तर अभियांत्रिकी अथवा वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी केवळ वार्षिक ५००० रुपयांची शिष्यवृत्ती मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या पश्चिम महाराष्ट्रातील कामगारांकडून १३ कोटीचा वेल्फेअर फंड वसूल करूनही केवळ सहा कोटी रुपये इतका निधी खर्च केला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे प्राप्त निधीचा योग्य प्रकारे विनियोग करुन कामगार व त्यांच्या कुटुंबांसाठी कल्याणकारी योजनांची तात्काळ अंमलबजावणी करुन कामगारांच्या पाल्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे विविध कार्यक्रम, उपक्रम व योजना राबविण्यासाठी मंडळाच्या ७ क्षेत्रिय विभागांना त्यांचे मागणीनुसार तसेच त्या-त्या लेखाशीर्षाखाली गतवर्षी झालेल्या खर्चाच्या प्रमाणात निधी मंजूर करण्यात येतो.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम,१९५३ मध्ये विभागानिहाय प्राप्त होणारे अंशदान त्याच विभागात खर्च करण्याबाबत कोणतीही तरतुद नाही. तथापि, मंडळाच्या क्षेत्रिय विभागाच्या मागणीनुसार व गतवर्षीच्या खर्चाच्या प्रमाणात आवश्यक निधी मंजूर करण्यात येतो.

(४) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास त्रिपक्षीय अंशदानाच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा स्त्रोत मर्यादित स्वरुपाचा असल्यामुळे, उपलब्ध निधीच्या मर्यादेत कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी विविध उपक्रम, कार्यक्रम व योजना मंडळाकडून राबविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयातील सी.टी. स्कॅन मशीन दुरुस्त करण्याबाबत

**(२५) * १९८६० श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर (जि.सोलापूर) येथे तेराशेहून अधिक आजारांवर उपचार केले जात असून रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात तपासणीकरीता प्रति दिन कर्नाटक राज्यासह इतर लगतच्या जिल्ह्यांतून बाराशे ते दीड हजार रुग्ण येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन मागील तीन-चार वर्षांपासून नादुरुस्त असून औषधांचा तुटवड्यामुळे तसेच रुग्णांना इतर रुग्णालयांमध्ये जाऊन अधिक पैसे मोजून सी.टी.स्कॅन करावे लागत असल्यामुळे गरजू, गरीब रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने तसेच रुग्णालय सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेमधून दाखल झालेल्या रुग्णांना खाजगी रुग्णालय यांच्यासोबत संस्थास्तरावर करण्यात आलेल्या सामंजस्य करारामधून (MOU) मोफत सीटी स्कॅन केले जातात व इतर रुग्णांना अल्प दरात सी.टी.स्कॅन केले जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यात बांधकाम कामगारांसाठी सुरु असलेल्या "मध्यान्ह भोजन" या योजनेत अनियमितता झाल्याबाबत

**(२६)** * **१९००० श्री.सुरेश धस :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातर्गत बांधकाम कामगारांसाठी सुरु करण्यात आलेल्या मध्यान्ह भोजन योजनेत झालेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने "मध्यान्ह भोजन" योजनेमध्ये भोजन पुरवठा करणाऱ्या यंत्रणेकडून मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा अहवाल दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त चौकशी समितीमध्ये अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, सहायक आयुक्त-समाज कल्याण विभाग व सहायक लेखा अधिकारी, जिल्हा पुरवठा विभाग इत्यादी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी सदर अहवाल प्रधान सचिव, कामगार विभाग व सचिव, कामगार कल्याणकारी मंडळ यांना पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यांतर्गत "मध्यान्ह भोजन" योजनेंतर्गत अद्यापपर्यंत एकूण किती निधी खर्च करण्यात आलेला आहे, एकूण किती रकमेचा अपहार झालेला आहे, किती कामगारांची बोगस नोंदणी करण्यात आली आहे, तसेच सदर गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन संबंधित भोजन पुरवठा करणाऱ्या कंपनीवर फौजदारी गुन्हे दाखल करुन अपहाराची रक्कम जमीन महसूलाप्रमाणे वसूल करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप इत्यादी व मध्यान्ह भोजन योजनेमधील भ्रष्टाचाराची सविस्तर चौकशी करणेबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेकडे प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी अप्पर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली होती. त्यानुसार चौकशी समितीचा अहवाल जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी शासनास सादर केला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मध्यान्ह भोजन पुरवठ्याकरीता नियुक्त संस्थेने सर्वेक्षणाअंती निवड केलेल्या बांधकामाच्या साईटची तपासणी करुनच तेथे कार्यरत असलेल्या कामगारांना मध्यान्ह भोजनाचा पुरवठा करण्यास मंडळाच्या उस्मानाबाद कार्यालयाने मान्यता प्रदान केल्याप्रमाणे मध्यान्ह भोजनाचा पुरवठा करण्यात आलेला आहे. पुरवठादार संस्थेने मध्यान्ह भोजन दिल्याच्या चलनाच्या प्रती मंडळाच्या उस्मानाबाद कार्यालयास सादर केल्या असून त्यांनी मंडळास शिफारस केल्याप्रमाणे माहे फेब्रुवारी, २०२२ ते मे, २०२३ या कालावधीतील रुपये ८६.२९ कोटी इतक्या रकमेच्या देयकाची अदायगी करण्यात आलेली आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यासाठी मध्यान्ह भोजन पुरवठा करण्याकरीता नियुक्त संस्थेने सर्वेक्षणाअंती निवड केलेल्या बांधकामाच्या ठिकाणावरील नोंदीत व अनोंदीत कामगारांना मध्यान्ह भोजन पुरवठ्याबाबत संबंधित विकासक/ठेकेदार/आस्थापनाचे सहमती पत्र प्राप्त करुन जिल्हा कार्यालयास सादर केलेल्या कामगारांच्या यादीस मंडळाच्या उस्मानाबाद कार्यालयामार्फत मंजूरी देण्यात आली आहे. अनोंदीत बांधकाम कामगारांना नोंदीत करण्याबाबत नियुक्त संस्थेस मंडळामार्फत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. मध्यान्ह भोजनाचा लाभ घेत असलेले कामगार हे जिल्ह्यातील विविध बांधकाम साईट / विट भट्टी / स्टोन क्रशर/ कामगार नाके इत्यादी ठिकाणी काम करीत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे शिरोली खुर्द (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या दोन वर्ग खोल्यांचे बांधकाम अवैधरित्या पाडल्याबाबत

**(२७) * १९३९३ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरोली खुर्द (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या दोन वर्ग खोल्या लेण्याद्री ओझर या प्रमुख जिल्हा मार्गालगत असून त्या रस्त्यासाठी बाधित ठरत असल्याने सदरचे बांधकाम काढून जागा रिक्त करणेबाबत सहायक अभियंता, श्रेणी १, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बारामती यांनी दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, ता.जुन्नर, जि.पुणे यांना पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय व्यवस्थापन समिती, सरपंच ग्रामपंचायत, शिरोली खुर्द व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जुन्नर यांनी विकासकासोबत संगनमत करून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी दिलेल्या सर्व आदेशांचे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी स्थानिक ग्रामपंचायत सदस्य यांनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जुन्नर, जि.पुणे यांचेकडे तक्रार दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन शासन आदेश व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा सुरु असलेल्या कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी सदर वर्गखोल्यांचे बांधकाम पाडणाऱ्या ठेकेदार प्रोजेक्ट मॅनेजर, एस.बी.आय.पी.एल, पुणे व सहायक अभियंता श्रेणी-१, सा.बां.उप.विभाग बारामती, पुणे यांना कारणे दाखवा नोटीस बजावून शाळा खोल्यांच्या आर्थिक नुकसानीची रक्कम आपणाकडुन का वसुल करण्यात येवू नये याबाबत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले. दरम्यान सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. याचदरम्यान संबंधित ठेकेदाराने दोन वर्गखोल्यांचे बांधकाम स्वनिधीतुन करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव मु.का.अ., जि.प. पुणे यांना सादर केला. सदर प्रस्तावास शिक्षण समितीच्या सभेमध्ये दिनांक १४/१०/२०२१ रोजी मंजुरी देण्यात आली असून त्यानुसार संबंधित ठेकेदाराने दोन नवीन वर्गखोल्या बांधुन दिलेल्या आहेत. सदर न्यायालयीन प्रकरणाचा निकाल जिल्हा परिषद, पुणे यांच्या बाजुने देण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धातु (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार, दुकाने माथाडी कामगार मंडळ, बृहन्मुंबई आणि कापड बाजार व दुकाने मंडळांच्या ठेवींमध्ये अपहार झाल्याबाबत

**(२८) * २०८१० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धातु (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार, दुकाने माथाडी कामगार मंडळ, बृहन्मुंबई या माथाडी मंडळास सेवा देणाऱ्या मूळ बँकेमध्ये असणारी रुपये २० कोटी रक्कम मंडळाच्या अध्यक्षांनी भारतीय स्टेट बँक, अंधेरी पूर्व शाखेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने सदर बँकेमध्ये परस्पर गुंतवून अपहार केल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कापड बाजार व दुकाने मंडळामध्ये कापड मंडळ अधिकारी यांनी सेवा देणारी मूळ बँक असतानाही ५ कोटी रुपयांची रक्कम दुसऱ्या बँकेत ठेवून सदर रकमेचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर महामंडळातील अपहारास जबाबदार असणाऱ्या मंडळाच्या अध्यक्षांवर व बँकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, अंशतः हे खरे आहे.

धातु (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार, दुकाने माथाडी कामगार मंडळाने भारतीय स्टेट बँक, अंधेरी (प) येथे दिनांक १३/०४/२०१६ रोजी रुपये २०/- कोटी इतकी रक्कम मुदत ठेवीत ठेवण्यात आली होती.

मंडळाने ठेवलेल्या एकूण रुपये २०/- कोटींपैकी रुपये १८/- कोटी रक्कमेच्या मुदत ठेवीचा परस्पर बँकेत अपहार झाल्याचे दिनांक १९/१०/२०१६ रोजी मंडळाच्या निदर्शनास आले होते.

सदर अपहार प्रकरणी अंबोली पोलीस ठाणे, अंधेरी (प.) येथे मंडळाच्या तत्कालीन अध्यक्षांनी क्र.४२६/२०१६, दिनांक १९/१०/२०१६ रोजी गुन्हा नोंदविला आहे.

सदरचा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. त्याचा गुन्हा नोंद क्र.१००/२०१६ असा आहे. आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांनी सदर गुन्ह्याचा तपास करून मा.अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी (एस्प्लनेड कोर्ट) आझाद मैदान, मुंबई यांच्या कोर्टात खटला क्र.८२३/२०१९ दाखल केलेला आहे. सद्य:स्थितीत खटल्यामध्ये सुनावणी चालू आहे.

तसेच अपहार झालेली रक्कम, तिच्यावरचे व्याज व सदर प्रकरणाचा न्यायालयीन खर्च वसुलीबाबत मा.मुंबई उच्च न्यायालय येथे समरी सुट/याचिका क्र.२१८/२०१८ मंडळाद्वारे दाखल करण्यात आलेली आहे.

अपहार झालेली रक्कम अद्यापी वसुल झालेली नाही. तथापि, आतापर्यंत झालेल्या तपासानुसार संबंधित बँकेचे तत्कालीन व्यवस्थापक व इतर आरोपी यांना अटक होवून सन २०१९ पासून न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले आहेत.

तथापि, सदर अपहार प्रकरणी संबंधितांशी मंडळाच्या अध्यक्षांनी बँकेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत केल्याचे पोलीस तपासात आढळून आलेले नाही, असे कामगार आयुक्तांनी कळविले आहे.

(२) होय, अंशतः हे खरे आहे.

५ कोटी रक्कमेचा अपहार झाला आहे हे खरे असून, ते मंडळातील अधिकाऱ्यांमार्फत अपहार झाला नसून, बँकेतल्या कर्मचाऱ्यांनी केलेला आहे.

(३) धातु (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार माथाडी कामगार मंडळाच्या ठेवीच्या अपहार प्रकरणी तत्कालीन बँक व्यवस्थापक व इतर २ आरोपी यांच्याविरूध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून अपहार झालेल्या रुपये ५ कोटी मुदत ठेवीची रक्कम व त्यावर ६.५० टक्के प्रमाणे व्याजासह ६,००,५०,११६.००/- रक्कमेच्या वसुलीकरीता मंडळाने मा.उच्च न्यायालयात बँकेविरूध्द कमर्शियल समरी सूट दाखल केलेला आहे. सदर प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२९) * २०१२५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, विविध विभाग प्रमुख, तंत्रज्ञ, परिचर, शिपाई इत्यादी अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्याने रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यास, रुग्णांस दाखल करून घेण्यात समस्या उद्भवत असून रुग्णालयांतील कार्यरत परिचारकांवर, तंत्रज्ञांवर अतिरिक्त ताण येत असून शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागत आहेत तसेच काही विभाग बंद करावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव येथील विविध संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

उपलब्ध मनुष्यबळामार्फत रुग्णसेवा सुरळीत सुरु आहे.

(३) रिक्त पदे भरणेबाबत नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रेल्वे गुड्स क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग मंडळ व माल वाहतूक कामगार मंडळात माथाडी अधिनियमाच्या तरतूदींशी विसंगत निर्णय दिल्याबाबत

**(३०) * २०८०६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेल्वे माथाडी मंडळातील टोळी क्र.४४ मधील माथाडी कामगारांची रेल्वे मंडळाने नोंद करुन रेलनीर पाण्याच्या बाटल्यांच्या वाहतूक व माल हाताळणीकरीता नेमणूक केलेली असून मजूरी व लेव्हीची रक्कम रेल्वे माथाडी मंडळात जमा करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथाडी अधिनियमांतर्गत मंडळांना लागू असलेल्या योजनेबाबत वाद उद्भवल्यास अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, राज्य शासन याबाबत सल्लागार समितीशी विचार विनिमय करुन अंतिम निर्णय घेण्यास सक्षम आहे, अशी स्पष्ट तदतूद असतानासुद्धा सह आयुक्त, कामगार (माथाडी) यांनी माथाडी अधिनियमाच्या तरतूदींशी विसंगत शासनाची मान्यता न घेता, कलम २ (क) मधील तदतूदींचा संदर्भ देऊन परस्पर चुकीचे निर्णय दिले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सह आयुक्त (कामगार) यांनी रेल्वे गुड्स क्लेअरींग ॲण्ड फॉरवर्डींग मंडळ व माल वाहतूक कामगार मंडळ यांची संयुक्त बैठक घेऊन अधिनियमाच्या कलम १४ नुसार सल्लागार समितीसमोर उपरोक्त प्रकरण सादर न करता व राज्य शासनाची मान्यता न घेता व्यक्तीगत हितासाठी परस्पर निर्णय दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी माथाडी अधिनियमाच्या कलम २३ नुसार शासनाने चौकशी करुन सह आयुक्त, कामगार (माथाडी) यांनी परस्पर दिलेल्या सर्व आदेशांना स्थगिती देऊन दोषींविरुध्द चौकशी करुन शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) रेल्वे गुड्स क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डींग मंडळाकडे मे.शुभम एंटरप्रायजेस यांच्या मार्फत दिनांक २३/११/२०१७ रोजीच्या पत्राद्वारे टोळी क्र.४४ च्या १० कामगारांचे नियत वाटप केलेले होते. माहे जानेवारी, २०१८ नंतर सदर टोळीचे काम बंद झालेले आहे.

(२), (३) व (४) माथाडी अधिनियमांतर्गत अधिनियमाची अंमलबजावणी करण्याकरीता बनवलेली योजना आस्थापनेला/मालकाला लागू करण्याची बाब माथाडी अधिनियमाच्या कलम ५ मध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

सदरचा विवाद दोन माथाडी मंडळाच्या नोंदीत कामगारांमध्ये कामाच्या हक्काबाबत आहे. त्यामुळे विवाद असल्याने औद्योगिक शांतता अबाधित राहण्यासाठी/प्रश्न सोडविण्यासाठी उभय मंडळांची बैठक बोलावून निर्णय घेण्याचे अधिकार शासनाने दिनांक १७/०७/२०१४ रोजीच्या पत्राद्वारे सह आयुक्त कामगार यांना दिलेले आहेत.

त्यानुसार दिनांक १८/०१/२०२२ रोजी उभय मंडळांची बैठक सह आयुक्त, कामगार (माथाडी) यांचे समोर आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर सर्व बाबी तपासून त्यांनी दिनांक १८/०४/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे सदर विवादात सह आयुक्त (माथाडी) यांनी सुचना दिलेल्या आहेत.

मंडळ योजनेच्या खंड २ (क) मध्ये सदरची योजना कोणत्या ठिकाणी केल्या जाणाऱ्या कामांना, ठिकाणांना लागू होते हे नमूद करण्यात आलेले आहे.

अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने सदर प्रकरण तपासून याबाबत सविस्तर चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत कामगार आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद औद्योगिक वसाहतीमध्ये राज्य कामगार विमा रुग्णालय (ईएसआयसी) च्या माध्यमातून वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत

**(३१) * १८८६६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद परिसरातील वाळुंज, चिकलठाणा, शेंद्रा, रेल्वेस्टेशन जवळ असणाऱ्या औद्योगिक वसाहतीत सुमारे ४ लाख कामगार कार्यरत असून कामगार व त्यांचे कुटुंबीय मिळून किमान ११ लाख व्यक्ती राज्य कामगार विमा रुग्णालयात (ईएसआयसी) सेवा व उपचार घेतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील राज्य कामगार विमा रुग्णालय (ईएसआयसी) च्या माध्यमातून आवश्यक त्या पूर्णतेसह राज्यातील पहिले वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव केंद्रीय कामगार मंत्रालयाकडे मान्यतेसाठी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उपरोक्त प्रस्ताव मंजुरीबाबत शासनस्तरावरून पाठपुरावा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील राज्य कामगार विमा रुग्णालय (ईएसआयसी) च्या माध्यमातून राज्यातील पहिले वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी जमीन, इमारत, भौतिक सोयी सुविधा व मनुष्यबळ निर्मितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) औरंगाबाद औद्योगिक क्षेत्रात राज्य कामगार विमा रुग्णालय तथा महाविद्यालय सुरु करण्याची बाब केंद्रशासनाच्या अखत्यारीतील असून त्याबाबत महामंडळाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्ह्यातील ८५ गावांमधील पाणी टंचाईची समस्या दूर करण्याबाबत

**(३२) * २०१०४ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील ८५ गावांत यावर्षी पाण्याची टंचाई निर्माण झाली असून त्यात ६२ गावे आणि २३ वाड्यांचा समावेश असल्याची बाब माहे मे, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील ८५ गावांनी विहीर अधिग्रहणासाठी प्रस्ताव दाखल केल्यानंतर त्याची तपासणी होऊन ते तहसिलदार कार्यालयाकडे सादर करण्यात आले असल्याचे दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सदर ८५ पाणी टंचाईग्रस्त गावांना (२३ वाड्यांसह) विहीरींद्वारे नियमितपणे पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) चौकशी करण्यात आली नाही तथापि, लातूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून ८५ गावे व ३६ वाड्यांकरीता १३१ विहीर अधिग्रहण प्रस्ताव स्थानिक प्रशासनांकडे प्राप्त झाले होते. त्यापैकी १२५ अधिग्रहण प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असून ६ प्रस्ताव आवश्यकता नसल्यामुळे नाकारण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मे. ए टु झेड एक्झीम या कंपनीने माथाडी कामगारांची मजुरी व लेव्हीची रक्कम थकविल्याबाबत

**(३३) * २०३४६ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ग्रेन डेपो रेल्वे यार्ड, शिवडी येथे सन २०१० पासून विविध सिमेंट कंपन्यांच्या माल हाताळणीचे काम करणाऱ्या मे. ए टु झेड एक्झीम या क्लियरिंग एजंट कंपनीची सन २०१८ मध्ये शासनाच्या किराणा बाजार व दुकाने मंडळात नोंदणी झाली असून सदर कंपनीने सन २०११ ते सन २०२२ या कालावधीतील लोडिंग-अनलोडिंगची कामे करणाऱ्या माथाडी कामगारांची मजुरी व लेव्हीची रुपये ११७ कोटी रक्कम थकविल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदर कंपनीने माथाडी कामगारांची मजुरी व लेव्ही थकविल्याचे सर्व पुरावे महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनने किराणा बाजार व दुकाने मंडळास सादर केले असून त्यानुषंगाने सदर मंडळाने मे. ए टु झेड एक्झीम या कंपनीला ११७ कोटी रुपये वसुलीची नोटीस दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ च्या कलम १३ अन्वये मंडळाने सदर कंपनीकडून माथाडी कामगारांची मजुरी व लेव्हीची रक्कमेची थकबाकी जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) याबाबत महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन यांचे निवेदन किराणा बाजार व दुकाने मंडळास प्राप्त झाले आहे.
(२) सदर संघटनेने कंपनीचा व्यवसाय सुरू झाल्यापासून म्हणजेच सन २०११ पासून दरवाढीच्या फरकाची रक्कम रूपये ११७ कोटी असल्याचे लेखी पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार मंडळाने प्राथमिकरित्या दिनांक १३/०७/२०२२ च्या पत्राद्वारे कंपनीस सूचनापत्र दिले होते.
(३) सदर आस्थापना सन २०१८ मध्ये माथाडी मंडळाकडे नोंदीत झालेली आहे. महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम १३ अन्वये कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, असे निदर्शनास आले की, माथाडी मंडळाने माथाडी अधिनियमातील योजनेच्या खंड ३३ अंतर्गत दिनांक ९/०३/२०२१ रोजी दरवाढीचे अंतरिम आदेश पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक १/१२/२०१८ पासून लागू केले आहेत. त्यामुळे मंडळाने दिनांक १/१२/२०१८ ते दिनांक ३१/०३/२०२१ या कालावधीतील मजुरी व लेव्हीची फरकाची रक्कम रुपये ९,३४,६५,३७९.९३ (रुपये नऊ कोटी चौतीस लाख पासष्ट हजार तीनशे ऐकोणऐंशी पैसे त्र्याण्णव फक्त) निर्धारित करण्यासाठी माथाडी अधिनियमाच्या कलम १३ अंतर्गत दिनांक २९/०७/२०२१ रोजी सुनावणी आयोजित केली होती.

दरम्यान किराणा बाजार व दुकाने मंडळाने खंड ३३ अंतर्गत दिनांक ०९/०३/२०२१ रोजी पारित केलेल्या अंतरिम आदेशाविरुध्द मे. ए टू झेड एक्झीम आस्थापनेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून, मा.न्यायालयाचा निर्णय प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यात पाणीपुरवठा योजनेच्या अनेक कामांच्या अंदाजपत्रकात अपहार झाल्याबाबत

**(३४) * २०८११ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात पाणीपुरवठा योजनेच्या अनेक कामांच्या अंदाजपत्रकात कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नांदेड यांनी हेतुपुरस्सर त्रुटी ठेवून तसेच कंत्राटदारांशी संगनमताने निकृष्ट दर्जाची कामे करवून घेत कोट्यवधी रुपयांचा अपहार केला असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे दिनांक ८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांनी प्रधान सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना ‘तात्काळ चौकशी करून प्रस्ताव सादर करण्याचे’ आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, सदरहू अहवालात कोणत्या शिफारसी करण्यात आल्या आहेत आणि उक्त प्रकरणातील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चौकशी समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त होताच तद्नुसार संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच संबंधित कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना पत्रान्वये सुचित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या जल जीवन मिशनअंतर्गत कामांच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(३५) * २०८०७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या जल जीवन मिशन योजनांच्या कामांच्या निविदा प्रक्रियेत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर आणि कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांनी संगनमत करून अनियमितता केल्याप्रकरणी चौकशी करून उचित कार्यवाही करण्याचे आदेश मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांनी प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांना दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे तद्नुषंगाने कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या जल जीवन मिशन योजनांच्या कामांच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) शासन स्तरावरून चौकशी समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त होताच तद्नुसार संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

तसेच संबंधित कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याबाबत दिनांक २६/०७/२०२३ रोजी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना पत्रान्वये सूचित करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लासूर स्टेशन (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालयात करण्याबाबत

**(३६) * १८८७० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १०५७० ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (औरंगाबाद) तालुक्यातील लासुर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर व श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालयात करण्याबाबतचा निर्णय १५ दिवसांत घेण्यात येईल असे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन शासनाने घोषित करूनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर व श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालयामध्ये झाल्यास परिसरातील ८० ते ९० गावांतील ग्रामस्थांना आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर व श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालयामध्ये करण्याबाबतचा सदर प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा यांना प्राप्त झाला असून सदर प्रस्तावामध्ये त्रुटी असल्यामुळे त्रुटींची पूर्तता करण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद यांना अवगत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर त्रुटींची पूर्तता करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर व श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालयात करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे, खरे नाही.

(३) आयुक्त, आरोग्यसेवा यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र लासूर स्टेशन (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) चे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याच्या निकषाची पुर्तता करीत नसल्याचे शासनास अवगत केले आहे.

(४) व (५) लासूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे व गंगापूर येथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यरत आहे.

-----------------

## राज्यातील माथाडी मंडळांना लेखे तयार करुन लेखापरिक्षण करणे बंधनकारक करण्याबाबत

**(३७) * २०३४७ श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कार्यरत असणाऱ्या ३६ माथाडी मंडळांपैकी अनुक्रमे कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, औरंगाबाद, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, जालना, परभणी, हिंगोली, अकोला, बुलढाणा, वाशिम, नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ जिल्ह्यातील माथाडी मंडळांच्या योजनेतील खंड क्र. ११, १२, १३, १६, २३, २४, २५, २६, २८, ३०, ३२, ३४, ३५ नुसार माथाडी मंडळातील लेखे (नोंदवही) तयार करणे व त्यानुसार लेखापरिक्षण करणे कायद्याने बंधनकारक असताना वर्षानुवर्षे लेखे (नोंद वही) तयार न करताच लेखापरिक्षण होत असल्याची बाब माहे जून, २०२३ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथाडी कायद्याचा दुरुपयोग थांबविणे व माथाडी मंडळातील योजनेची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे यासाठी शासनाने दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय कृती समिती गठीत करून समितीचे अध्यक्ष, जिल्हाधिकारी व सचिव तसेच मंडळाचे अध्यक्ष तथा सहायक कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली उद्योगातील मालकांना व मंडळातील नोंदीत कामगारांना बाहेरील गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून होणाऱ्या त्रासातून मुक्तता करण्यासाठी दरमहा बैठक आयोजित करण्याचे आदेश असूनही कृती समितीच्या अध्यक्ष /सचिवांनी आजतागायत एकही बैठक घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लेखे (नोंद वही) तयार करुन लेखापरीक्षण करणे बंधनकारक करण्याबाबत तसेच मंडळातील नोंदीत कामगारांच्या समस्यांचे निराकारण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अशा आशयाचे निवेदन सचिव, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन यांनी कामगार आयुक्त यांना जुन,२०२३ च्या दरम्यान दिलेले आहे.

(२) हे खरे नाही.

माथाडी कायद्याचा दुरुपयोग थांबविणे व माथाडी मंडळातील योजनेची योग्य अंमलबजावणी करणे यासाठी शासनाने दिनांक ०६/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय कृती समित्या गठित करण्यात आल्या आहेत. राज्यात कार्यरत असणाऱ्या ३६ माथाडी मंडळांपैकी अनुक्रमे कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, औरंगाबाद, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, जालना, परभणी, हिंगोली, अकोला, बुलढाणा, वाशिम, नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ या माथाडी मंडळांच्या जिल्हास्तरीय कृती समितीच्या एकूण ४७ बैठका संपन्न झाल्या आहेत.

(३) माथाडी अधिनियम व योजनेतील तरतूदीनुसार माथाडी मंडळातील लेखे (नोंदवही) तयार करुन त्यानुसार लेखापरिक्षण करण्यात येते. शासनाने दिनांक ०६/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये कृती आराखडा तयार करुन जिल्हास्तरीय कृती समित्या गठित करण्यात आल्या आहेत. तसेच मंडळस्तरावर बैठका घेऊन मंडळातील नोंदीत कामगाराच्या समस्यांचे निराकरण करण्यात येते. तसेच सर्व माथाडी मंडळातील लेखे (नोंदवही) तयार करुन नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकांमार्फत नियमित व विहीत कालावधीत लेखापरिक्षण करुन शासनास वेळोवेळी सादर करण्याबाबत सर्व माथाडी मंडळांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.